६६

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पोआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 26 MAY 1994

प्रति,
अध्यक्ष,
रयत शिक्षण संस्था
सातारा

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणे-बाबत.

===========================================================

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-~~१०९३/(प्रि३४)/प्राशि-३~~ १०९४/(८६५९) प्राशि-३ दि. ~~२२.४.९४~~ २०.५.९४

वरील विषयाचे संदर्भाधीन शासनाकडील संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या औंधगांव पुणे या ठिकाणी खाजगी प्राथमिक शाळेस मराठी/~~इंग्रजी~~ माध्यमातुन सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यासच शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न. प्रा. शि. मं. यांचे-कडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणेबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

..२..

मुख्याध्यापक
रयत शिक्षण संस्थेचे
प्राथमिक विद्या मंदिर
औंधगाव, पुणे - ७

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था उघडणार नाही असे संस्थेने रु. १०/-च्या स्टॅंप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातुन शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम सोडता अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु. १०/- च्या स्टॅंप पेपरवर द्यावी.

१३] ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची त्याच वर्षी संस्थेने शाळा सुरु न केल्यास शाळेच्या नूतनीकरणासाठी अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शाळेस द्यावयाची परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

वरील अटींची पूर्तता होत असलेबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ]जिप/प्रशासन अधिकारी न. पा. शि. मं. यांचेकडे त्वरित सादर करावी. म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१करिता.

प्रत-माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक]जिल्हा परिषद, पुणे विभाग

२] प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. पुणे विभाग.

त्यांनी शाळांकडून पूर्तता होत असल्याबाबतचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत इत्यादि प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]

७] शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/-दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयात पाठवावा.

सही/- x x x

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत-
प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ
जिल्हा-----------------यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत-
मा. सचिव---रयत शिक्षण संस्था, सातारा.
-----------------------यांना माहितीसाठी अग्रेषित.

खरी प्रत

Science Consultant
Dy. Director of Education
Pune Region Pune

रयत शिक्षण संस्था
परिश्रम विभाग, औंधगांव, पुणे-७
ता. 06 APR 1995
आवक क्र.

मुख्याध्यापक
रयत शिक्षण संस्थेचे
प्राथमिक विद्या मंदिर
औंधगाव, पुणे - ७